## प्रेस नोट दिनांक १७/०१/२०२५

# सराईत आरोपीकडून, १४.७७ तोळे सोन्याचे व ८९.५३ तोळे चांदीचे दिगीने जप्त. शहर गुन्हे शाखेची कामगिरी.

---

दिनांक ०७/०१/२०२५ रोजी, स.पो.नि.संदिप पाटील व त्यांचे तपास पथकास रेकॉर्ड वरील आरोपी नामे- राजकुमार विभुते हा, मुळेगांव क्रॉस रोड परिसरात पहाटे ०६.०० वा. चे सुमारास तोंडास मास्क लावुन, संशयीतरित्या फिरत असताना मिळुन आला. त्यावेळी, स.पो.नि.संदिप पाटील व त्यांचे तपास पथकाने सराईत गुन्हेगार नामे- **राजकुमार पंडीत विभुते, वय-४३ वर्षे, व्यवसाय-मजुरी, रा. मु.पो. बोरामणी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर** यास ताब्यात घेवुन, त्याचेकडे कौशल्यपुर्वक तपास केला असता, त्याने, एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे गुरनं-२९६/२०२४ भा.दं.वि.कलम-४५४, ४५७, ३८० अन्वये, दाखल गुन्हा केल्याचे कबुली दिली. त्यास वरील नमूद गुन्ह्यात अटक करून, गुन्ह्यातील गेलामाल हस्तगत करणेकामी त्याची पोलीस कोठडी रिमांड घेतली असता, त्यांने खालील प्रमाणे गुन्ह्यातील सोन्या-चांदीचे दागिने काढुन दिले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. / कलम | जप्त मालाचे वर्णन |
|---|---|---|---|
| १ | एम.आय.डी.सी. | गु.र.नं.-२९६/२०२४<br>भा.दं.वि. कलम ४५४, ४५७, ३८० | **१४७.७ ग्रॅम सोने<br>८९५.३ ग्रॅम चांदी** |

**अशा प्रकारे शहर गुन्हे शाखेने, घरफोडी चोरीचा गुन्हा उघडकीस आणुन, १४७.७ ग्रॅम (१४.७७ तोळे) सोन्याचे व ८९५.३ ग्रॅम (८९.५३ तोळे) चांदीचे दागिने असा एकुण रू.४,४८,३००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.**

सदरची कामगीरी, मा. श्री. एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे/वि.शा., श्री.राजन माने, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली, स.पो.नि./संदिप पाटील, व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार- विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे, अर्चना स्वामी, चालक सतिश काटे, नेताजी गुंड, सायबर पो.स्टे. कडील प्रकाश गायकवाड व मच्छिंद्र राठोड, यांनी केली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**करीता.**